**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -४०**

मा.प्रशासक ठराव क्र. ४३२ — विषय क्रमांक- ४३२

दिनांक- १८ /०३/२०२५ — विभाग - रक्तपेढी विभाग

---

**विषय :-** रक्तपेढी विभागासाठी तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदावर अटी व शर्ती प्रमाणे नियुक्ती केलेल्या मानधन वरील करारबध्द नियुक्ती वरील मुदत संपत असलेल्या उमेदवारांच्या पुर्ननियुक्तीस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, रक्तपेढी विभागामध्ये खालील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या प्रमाणे कर्मचारी तात्पुरत्या स्वरूपात मानधावर काम करत असून तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे अ.क्र.१ यांचा कालावधी दि.०७/०६/२०२५ अखेर आहे व अ.क्र.२ यांचा कालावधी २४/०५/२०२५ अखेर आहे. व अ.क्र.३ यांचा कालावधी २६/०६/२०२५ अखेर आहे. सदर कर्मचा-यांचे काम समाधानकारक असून अन्न औषध प्रशासनाच्या नियमानुसार रक्तपेढी विभागासाठी सदर कर्मचा-यांची आवश्यकता आहे.

तसेच सौ.सुनिता संपत पवार टेक्निकल सुरपवायाझर यांनी राजीनामा सादर केलेला आहे व डॉ.सिमा सोनल भालसिंग रक्तसंक्रमण अधिकारी यांनी पुढील नेमणुक नको असले बाबत स्वेच्छा अर्ज दिलेला आहे.

| अ.क्र. | नांव | पद | मुदत संपुष्टात येण्याचा कालावधी | मासिक मानधन | सहा महिन्या करीता एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.सोमनाथ जयराम नंदकर | रक्तसंक्रमण अधिकारी | ०७/०६/२०२५ | ७५,०००/- | ४,५०,०००/- |
| २ | संतोष भाउसाहेब काळे | जनसंपर्क अधिकारी | २४/०५/२०२५ | २०,०००/- | १,२०,०००/- |
| ३ | इबारतुननिसा अन्सारी | परिचारीका | १८/०६/२०२५ | २०,०००/- | १,२०,०००/- |
| | | | | एकुण | ६,९०,०००/- |

तरी उपरोक्त तक्त्यात नमुद केल्या प्रमाणे कर्मचा-यांना नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देवून अ.क्र.१ यांना दि.११/०६/२०२५ पासुन व अ.क्र.२ कालावधी २८/०५/२०२५ पासुन व अ.क्र.३ यांना दि.२२/०६/२०२५ पासुन पुढील सहा महिन्या करिता नियुक्ती देणेस व रू.१०० चे स्टॅप पेपरवर करारनामा करून घेणस त त्या अनुषंगाने येणा-या रक्कम रूपये ६,९०,०००/- (अक्षरी रू.सहा लाख नव्वद हजार मात्र) च्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदर

प्रास्तावास तसेच रिक्त होणारे टेक्निकल सुपरवायझर १ पद व रक्तसंक्रमण अधिकारी १ पद मंजुर ठेकेदार यांचेकडून घेणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणे येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -४०**

मा.प्रशासक ठराव क्र. ४३३ — विषय क्रमांक- ४३३

दिनांक- १८ /०३/२०२५ — विभाग- प्रभाग समिती क्र.४

-------------------------------------------------------------------------------------------

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांव रोड, बील क्र. Z४२२१०६४०९ ते Z४२२१०६४६४ "ए " इमारतीमधील १ ते ५६ गाळे मनपा मार्फत पाडलेले असल्याने त्यागाळयांचे मालमत्ता कर बील व इतर कर व २%शास्तीची थकबाकी निर्लेखित करणेबाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार जवाहर मुथ्था यांनी दि.२७/१२/२०२१ रोजी अर्ज देवून कळविले की,वाडीयापार्क येथील A व B इमारत आपल्याकडून डिसेंबर २०१९ मध्ये पाडण्यात आली. तसेच सन २०१४ मध्ये मा.विभागीय आयुक्त नाशिक यांच्या आदेशानुसार सदरचे A व B इमारत मधील दुकान गाळे सील करण्यात आली होती. तेव्हापासुन A व B इमारत बंद होत्या. त्यानंतर डिसेंबर २०१९ मध्ये A व B इमारत मनपा मार्फत पाडल्या. त्याची घरपट्टी निर्लेखित करण्यात यावी याप्रमाणे अर्ज दिलेला आहे.

वाडीया पार्क येथील A इमारतीला मालमत्ता कराची आकारणी करणेत आलेली होती. A इमारतीमध्ये एकुण ५६ गाळे आहेत. A इमारतीचे बांधकाम विकसीत करण्याचे काम खाजगी व्यवसायीक श्री.एम.आर.मुथ्था विकासक जिल्हा क्रीडा संकुल प्रकल्प,सेक्टर नं.१ एम.आर.ट्रेड सेंटर,वाडीया पार्क,टिळक रोड यांना देण्यात आले होते. संबधित व्यासवसायीक यांनी मंजुर नकाशप्रमाणे बांधकाम न करता मोठया प्रमाणावर विना परवाना अतिरिक्त जादा अनाधिकृत बांधकाम केले. ही बाब लक्षात आलेनंतर मनपा ने अतिरिक्त बांधकामाची चौकशी करून कार्यवाही सुरू केली असता मा.महासभा ठराव क्र.५ दि.२०/११/२०१४ अन्वये मा.उच्च न्यायालयात दावा दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.४०४५/२००५ अन्वये दावा दाखल करण्यात आला. सदर अपिलाची सुनावणी सुरू असतांना मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचे कडील पत्र क्र.१/२ जा.क्र.१२९७७३७/२०१३ दि.२०/१२/२०१३ चे पत्रातील आदेशानुसार A इमारत सन २०१४ साली सील करण्यात आली. मा.उच्च न्यायालयात चालू असलेल्या अपिलाच्या दि.२५/१०/२०१३ रोजी निकाल देवून मा.उच्च न्यायालयाने A व B इमारती निष्कासीत करण्याचे आदेश दिलेले होते. मा.उच्च न्यायालयाचे निकालानुसार वाडीया पार्क येथील A व B इमारत डिसेंबर २०१९ मध्ये जमीनदोस्त करणे आली आहे.

वाडीया पार्क A इमारत मधील पाडलेल्या १ ते ५६ गाळयांना प्रथम मालमत्ता कर आकारणी सन २०१० -११ या वर्षी झालेली आहे. मा.विभागीय आयुक्त,नाशिक यांचे आदशानुसार सदर A इमारत सन २०१४ साली सील करण्यात आली होती. त्यानंतर उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद यांच्या निर्णयानुसार A इमारत डिसेंबर २०१९ मध्ये मनपा मार्फत जमीनदोस्त करून १ ते ५६ गाळे पाडण्यात आलेले आहे. सदरचे बांधकाम निष्काशित करण्यापूर्वीची दि.३१/०३/२०१४ अखेरची एकुण थकबाकी रक्कम शास्तीसह रू.१८,३१,१७८/- वाडीया पार्क येथील A इमारती मधील मालमत्ता क्रमांक बील क्र. Z४२२१०६४०९ ते Z४२२१०६४६४ या ५६ गाळेधारकांच्या (भोगवटदार ) शहरातील त्यांच्या मालकीच्या इतर मालमत्तांचा शोध घेवून त्या मालमत्ता करामध्ये सदरची रक्कम समाविष्ठ करण्यात येवून वसुल करण्यात यावी.

तसेच निष्कासित दिनांकापासून सन २०२४-२०२५ अखेरची प्रभाग समिती क्र.४ वसुली वॉर्ड क्र.२२ मधील वाडीया पार्क येथील A इमारती मधील मालमत्ता बील क्र. Z४२२१०६४०९ ते Z४२२१०६४६४ या ५६ बीलांवरील थकबाकी शास्तीसह निर्लेखित करणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

निर्णयः- महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

## अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -४०**

मा.प्रशासक ठराव क्र. ४३४ विषय क्रमांक- ४३४
दिनांक - १८ /०३/२०२५ विभाग - पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या पिंपळगांव माळवी येथील तलावात बोअर व विहिर घेण्यासाठी परवानगी मिळणे करीता स्थायी समिती मंजुरी मिळणे बाबत..

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,विषयांकीत बाबत प्रा. अशोक जोगदे, सचिव, एफर्टस मल्टिपर्पज फौंडेशन, धनगरवाडी, अहिल्यानगर यांचे संदर्भिय पत्र इकडेस प्राप्त असून त्यामध्ये त्यांनी आपणा सर्वांच्या सहकार्याने अहिल्यानगरीत धनगरवाडी परिसरात सर्व्हे नं. १०१ मध्ये खगोल शास्त्राचा विधिवत अभ्यास करण्यासाठी Space Odyssey Planetarium व महसूल खात्याच्या सर्व्हे नं. १०० वर अहिल्यानगर Observatory सुरू आहे. याद्वारे अहिल्यानगर जिल्हयातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा ज्या सहलीच्या निमित्ताने येतात. त्यांना खगोल शास्त्राची ओळख करून दिली जाते. याच परिसरात निवासी माध्यमिक शाळा व ज्युनिअर कॉलेज ही आहे. या सर्वांचे संचालन एफर्टस मल्टिपर्पज फौंडेशन द्वारे केले जाते.

यासाठी धनगरवाडी ग्रामपंचायतीने महानगरपालिकेच्या परवानगीने पिंपळगाव तलावात बोअर घेउन, तेथून विहिरीत पाणी सोडण्याचा पर्याय आम्हांस दिला व त्यासाठी त्यांचे संमती पत्र ही देवू केले. त्यानुसार आम्ही आपणाकडे आपल्या मालकीच्या तलावातील जागेत बोर व विहिर घेण्यासाठी आपणाकडे विनंती अर्ज करीत आहोत. तरी आपणास पुनश्च विनंती करतो की आमचा प्रश्न सोडविण्यासाठी आपण आम्हांस बोअर व विहिर घेण्याची संमती द्यावी. आम्ही स्वखर्चाने बोअर व विहिर घेण्यास तयार आहोत. असे कळविले आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की, पिंपळगाव माळवी तलावाचे संपूर्ण क्षेत्र महानगरपालिकेचे मालकीचे आहे. सन १९८५ पासून सदर तलावातील पाण्याचा पिण्यासाठी तत्कालीन नगरपालिका व महानगरपालिके मार्फत वापर केलेला दिसून येत नाही. सद्दस्थितीतही या तलावाच्या पाण्याचा कोणताही वापर महानगरपालिके मार्फत करण्यांत येत नाही. सदर तलावाचे बुडीत क्षेत्रात डोंगरगण, मांजरसुंबा, धनगरवाडी, पिंपळगाव माळवी व आढाववाडी गावाकरीता सार्वजनिक पिण्याच्या पाण्यासाठी विंधन विहीर घेण्यास मा.स्थायी समिती, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे मंजूरीने तात्पुरत्या स्वरूपात परवानगी देण्यात आलेली आहे.

एफर्टस मल्टिपर्पज फौंडेशन, धनगरवाडी, अहिल्यानगर, या संस्थेस अहिल्यानगर महानगरपालिकेच्या पिंपळगांव माळवी तलाव क्षेत्रात स्वखर्चाने विंधन विहीर (बोअरवेल ) घेणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ मधील नगरपालिकेच्या मालमत्तेचा विनीयोग कलम ७९ [ब] अन्वये सदर जागे वरील महानगरपालिकेचा मालकी हक्क अबाधीत ठेवून संबधीत संस्थेकडून एक वर्षाची आगावू पाणीपट्टीची आकारणी करून तात्पुरत्या स्वरूपात परवानगी देण्यास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

विंधन विहीरीचे (बोअरवेल ) चे पाणी मीटरव्दारे पाटबंधारे विभागाकडून शासनाचे दराप्रमाणे आकारणी करणे बाबत विभागाने कार्यवाही करावी.

---

निर्णयः- महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -४०**

मा.प्रशासक ठराव क्र. ४३५ — विषय क्रमांक- ४३५
दिनांक - १८ /०३/२०२५ — विभाग - बांधकाम विभाग

---

**विषय :-** मा.शासनाकडून प्राप्त होणा-या १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातुन केडगांव उपनगराच्या वाढीव भागासाठी पाणी पुरवठा योजना राबविणे करीता निविदाधारक यांचे प्राप्त दरास मान्यता मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, मा.शासना कडून प्राप्त होणा-या १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून केडगाव उपनगराच्या वाढीव भागासाठी पाणी पुरवठा योजना राबविणे या कामाची ई निविदा क्र. ११२३६६४-१, दि.१२/१२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर निविदेस ड्रिम इफ्रास्ट्रक्शन, बदलापुर, ठाणे व ओम साई कन्स्ट्रक्शन, अहिल्यानगर यांचे दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त दोनही निविदाधारकांची तांत्रिक कागदपत्रांची छाननी दि.१७/०१/२०२५ रोजी मा. छाननी समिती समोर करण्यात आली. अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करणे कामी संदर्भिय पत्र क्र... अन्वये कळविण्यात आले.

ड्रिम इफ्रास्ट्रक्चर यांनी अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता केली नाही. त्यामुळे त्यांना अपात्र ठरविण्यात आले व ओम साई कन्स्ट्रक्शनन यांचे तांत्रिक कागदपत्रे यथायोग्य असल्याने दि. २८/०१/२०२५ रोजी आर्थिक लिफाफा उघडण्यात आला. ओम साई कन्स्ट्रक्शचन यांचे प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र | निविदाधारकाचे नाव | निविदा दर (GST व्यतिरिक्त) | प्राप्त निविदा दर (GST व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|
| १ | ओम साई कन्स्ट्रक्शन, अहिल्यानगर | रू.१,५४,८०,३१५/- | ९.९९ % जादा दराने म्हणजेच रू. १,७०,२६,७९८/- |

विषयांकीत कामी निविदाधारक ओम साई कन्स्ट्रक्शन यांचे प्राप्त दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९% जादा दराने प्राप्त झालेले आहे. निविदाधारकाचे प्राप्त दर जास्तीचे व अवाजवी असल्याने ओम साई कन्स्ट्रक्शन यांना दराचे वाटाघाटी करिता दि. ३०/०२/२०२५ रोजी पत्र देण्यात आले होते. परंतू दराची वाटाघाटी होवू शकलेली नाही.

या अनुषंगाने ओम साई कन्स्ट्रक्शन यांचे संदर्भिय पत्र क्र. ५ प्राप्त झाले असून " या निविदेमध्ये पाण्याची टाकी व डी.आय. पाईप लाईन टाकणे आहे सदर कामाचे डी आय पाईपचे दरसुची दर व बाजारभाव दर यामध्ये २५० ते ३०० रूपये प्रति मीटरने बाजारभाव जास्त आहे व टाकीसाठी स्टील व सिमेंट यांचे दर सुध्दा खूप वाढलेले आहेत. तरी ९.९९ % या दराला मान्यता देण्यात यावी " असे इकडेस विनंती केलली आहे. तसेच सोबत बाजारातील दरपत्रक जोडलेले आहे.

ओमसाई कन्स्ट्रक्शन यांचे दिनांक १०-०३-२०२५ रोजी सदर काम मी निविदा दराने करण्यास तयार असले बाबत पत्र दिले असल्याने केडगांव उपनगराच्या वाढीव भागासाठी पाणी पुरवठा योजना

राबविणे करीता निविदाधारक ओम साई कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रक्कम रू. १,५४,८०,३१५/- प्रमाणे करून घेणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

निर्णयः- महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका